प्रेस नोट    दिनांक :– २६/१०/२०२१

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुनी इमारत, भिवंडी येथील लोकसेवक श्री. आनंद गौतम जगताप, वय–४४ वर्षे, मूळ पद–लिपीक, अतिरिक्त कार्यभार–कार्यालयीन अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी विभाग, (वर्ग–३), भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुनी इमारत, भिवंडी **यांस लाच स्विकारताना लाचलूचपत प्रतिबंध विभाग, ठाणे पथकाने ताब्यात घेतलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. आनंद गौतम जगताप, वय–४४ वर्षे, मूळ पद–लिपीक, अतिरिक्त कार्यभार–कार्यालयीन अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी विभाग, (वर्ग–३), भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुनी इमारत, भिवंडी. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ५,०००/– रुपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/– रुपये. |
| थोडक्यात हकिकत | तक्रारदार यांनी दि. २५/१०/२०२१ रोजी लोकसेवक श्री.आनंद गौतम जगताप, मूळ पद–लिपीक, अतिरिक्त कार्यभार–कार्यालयीन अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी विभाग, (वर्ग–३), भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुनी इमारत, भिवंडी यांचेविरुद्ध लाचेच्या मागणीच्या अनुषंगाने लेखी तक्रार दिली होती.<br>दि. २६/१०/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. आनंद जगताप यांनी तक्रारदार यांचा मयत भाऊ यांचा भविष्य निर्वाह निधिचा चेक काढणेकरिता त्यांचेकडे ५,०००/– रू. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४,०००/– रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्या अनुषंगाने दि.२६/१०/२०२१ रोजी सापळा आयोजित केला असता लोकसेवक आनंद गौतम जगताप यांनी त्यांचे कार्यालयात तक्रारदार यांचेकडून ४,०००/– रु. लाचेच्या रकमेचा स्विकार केला असता, त्यांना १२:३१ वा. ला.प्र.वि., ठाणे पथकाकडून रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी – मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले सो., पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


**संपर्क पत्ता** :– ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१.

**संकेतस्थळ** :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

**ई–मेल** :– spacbthane@mahapolice.gov.in

**<u>ऑनलाईन तक्रार</u>**

**अॅप्लीकेशन** :– acbmaharashtra.net

**टोल फ्री नंबर** :– १०६४.

**दुरध्वनी क्रमांक** :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९.

**व्हॉटस् अॅप क्रमांक** :– ९९३०९९७७००.